# सर्वांच्या समन्वयाची गरज

एकात्मिक तिकीटासाठी 'बेस्ट' प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. तसेच रेल्वेदेखील यासाठी विचार करीत आहे. त्यानंतर आता मेट्रो-३ साठी 'एमएमआरसी' प्रयत्नशील आहे. मुंबईकर प्रवाशांची संख्या आणि गरज लक्षात घेऊन ही एकात्मिक व स्वयंचलित तिकीट प्रणाली अत्यावश्यक झाली आहे. त्यामुळेच ही प्रणाली प्रत्यक्षात आणण्यासाठी या सर्वच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांच्या प्रशासनाकडून विविध पातळ्यांवर समन्वय असणे गरजेचे आहे. सर्व संबंधित सार्वजनिक वाहतूक सेवा प्रदाता विभागांनी समन्वय साधल्याशिवाय ही यंत्रणा उपलब्ध होऊ शकत नाही. तसे झाले तरच या योजनेचा अंतिम लाभार्थी असलेल्या प्रवाशाला फायदा होणार आहे. प्रवाशांच्या हिताचा विचार येऊन तसा पुढाकार या यंत्रणांनी घेणे आवश्यक आहे, अन्यथा ती सेवा एकात्मिक न राहता केवळ स्वयंचलित तिकीट इतकीच मर्यादित राहिल.